महाराष्ट्र टाईम्स

14 AUG 2026

स्थापना १९५२ | नोंदणी क्रमांक २०२७१

# दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी.डि.मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

दिनांक : १४.०८.२०२६

## ७४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांची चौ-याहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दिनांक ३१.०८.२०२६ रोजी, सायंकाळी ५.०० वाजता श्री शिवाजी मंदिर, न.चि., केळकर पथ, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८ येथे खालील कामकाजांचा विचार करण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित राहावे.

### विषयपत्रिका

१) दिनांक २९.०९.२०२५ रोजी झालेल्या ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास व वैधानिक हिशेब तपासनीसांनी तपासलेले दि.३१ मार्च २०२६ अखेरचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यांस मान्यता देणे.

३) दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या कालावधीकरीता वैधानिक हिशेब तपासनीस यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणे व सन २०२४-२०२५ च्या वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवालाची नोंद घेणे.

४) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या नामतालिकेमधील, भारतीय रिझर्व्ह बँकेने मंजूरी दिलेल्या वैधानिक लेखा परिक्षकांच्या नेमणूकीस मान्यता देणे.

५) नफा वाटणीस मंजूरी देणे.

६) मा. वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेली संशयित व बुडीत येणे बाकी कर्ज वसुलीचा अधिकार अबाधित राखून निर्लेखित करण्यास मंजूरी देणे.

७) बँकेच्या सभासद कर्जदारांना कर्ज विमा कवच/विमा संरक्षण देण्यासाठी विमा प्रिमियम व कर्ज संरक्षण मर्यादा ठरविणेसाठी संचालक मंडळास अधिकार बहाल करणेबाबत.

८) सभासदांच्या मासिक सक्तीची ठेव वर्गणी रकमेमध्ये किमान रु.१,०००/- वरुन रु.२,०००/- पर्यंत वाढ करण्यास मंजूरी

९) बँकेच्या उपविधीतील पोटनियम क्रं. ४२ (१)(अ) मध्ये बदल करण्यास मंजूरी देणे.

१०) बँकेच्या ७४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांची गैरहजेरी माफ करणे.

११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने, नियमांस अनुसरुन, आयत्यावेळी येणा-या कामकाजाचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या हुकूमावरुन

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४.०८.२०२६

**वि.ही. रावदका**
**महाव्यवस्थापक**

### सूचना

१) सर्वसाधारण सभेच्या निश्चित केलेल्या वेळी गणसंख्या पूर्ण न झाल्यास सभा तहकूब करण्यात येईल. अशी तहकूब झालेली सभा त्यानंतर अर्ध्या तासाने त्याच दिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) सभासदांना वरील कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास त्यांनी कार्यालयीन वेळेत, मुख्य कार्यालयात, महाव्यवस्थापक यांना पूर्वसूचनेनुसार भेटावे.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने सभासदांनी त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत सभेपूर्वी ७ दिवस अगोदर लेखी सूचना द्यावी व सभेच्या वेळी संबंधीत विषयावरील चर्चा चालू असताना त्याबाबत विचारणा करावी. आयत्यावेळी विचारलेली माहिती देणे शक्य होणार नाही.

४) दिनांक २९.०९.२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत त्याचप्रमाणे सन २०२५-२०२६ चा वैधानिक हिशेब तपासनीसांचा अहवाल व सन २०२४-२०२५ चा वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवाल सभासदांच्या अवलोकनार्थ दिनांक १४.०८.२०२६ पासून कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात येईल. तसेच बँकेच्या सर्व शाखांमध्ये मागील सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती दिनांक १४.०८.२०२६ पासून सभासदांच्या अवलोकनासाठी कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील.

५) ज्या सभासदांनी त्यांचा ई-मेल आय.डी. किंवा मोबाईल क्रमांकाची बँकेकडे नोंद केली नसेल त्यांनी याबाबतची माहिती संबंधीत शाखा कार्यालयात अद्ययावत करण्यात यावी.

६) बँकेच्या **www.mcb.bank.in** या वेबसाईटवर ७४ वा वार्षिक अहवाल सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात येईल.